स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ.नांदेड ,

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाच्या सामाजिक शास्त्र विद्याशाखे अंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.पदवी करिता सदर करण्यात येणारा शोध प्रबंधाचा आराखडा .डी .

संशोधन विषय

महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा एक चिकित्सक अभ्यास

विशेष कालखंड (२००९ -२०१९)

संशोधक

चेतनकुमार गंगाराम जकुलवार

एम .ए. (राज्यशास्त्र) सेट, नेट

मार्गदर्शक

प्रो. डॉ. एस. बी. फड

राज्यशास्त्र विभग प्रमुख,

ने. सु. बो. महाविद्यालय नांदेड

संशोधन केद्र

पीपल्स महाविद्यालय.नांदेड ,

सप्टेंबर २०२३

महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा एक चिकित्सक अभ्यास

(कालखंड 2009 ते 2019)

प्रस्तावना :-

भारत हा देश जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेले राष्ट्र म्हणून ओळखले जाते. भारतात मोठ्या प्रमाणात भाषिक व सांस्कृतिक विविधता असून ही आज 75 वर्षांनंतरही लोकशाही टिकून आहे, ही या देशाची एक खूप मोठी यश प्राप्ती म्हणावी लागेल. राज्यकारभार सुरळीत चालण्यासाठी संघराज्य पद्धतीचा भारताने स्वीकार केला आहे. या संघराज्य पद्धतीनुसार दोन किंवा अधिक स्तरावरून देशाचा राज्यकारभार केला जातो. त्यानुसार भारतामध्ये केंद्र आणि राज्य या दोन सत्ता असून केंद्र सत्तेद्वारे देशाचा व राज्य सत्तेद्वारे राज्याचा राज्य कारभार केला जातो. सध्या भारतात 28 घटक राज्य व आठ केंद्रशासित प्रदेश आहेत. केंद्र आणि राज्य या दोन्ही पातळीवर कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ या तीन घटकांमध्ये सत्तेचे विभाजन करण्यात आले आहे. केंद्रस्तरावरील कायदेमंडळ 'संसद' म्हणून ओळखले जाते. तर राज्यस्तरावरील कायदेमंडळ हे 'विधिमंडळ' म्हणून ओळखले जाते. विधिमंडळात राज्यपाल, विधानसभा व विधान परिषद या तीन घटकांचा समावेश होतो. यातील विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह असून ते स्थायी स्वरूपाचे आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभेचे सदस्य, पदवीधर व शिक्षक इत्यादींचे प्रतिनिधी असतात. त्याचबरोबर राज्यपालांकडूनही बारा सदस्यांची नेमणूक विधानपरिषदेवर केली जाते.

विधिमंडळातील विधानसभा हे कनिष्ठ सभागृह असून या सभागृहाच्या दर पाच वर्षांनी निवडणुका होतात. या सभागृहामध्ये लोकांकडून प्रत्यक्षपणे निवडल्या गेलेल्या लोकप्रतिनिधींचा समावेश असतो. विधानसभा हे सभागृह प्रत्यक्षपणे लोकांचे प्रतिनिधित्व करत असल्याने या सभागृहातील प्रतिनिधित्वाला खूप महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे राज्याच्या लोकशाहीचा केंद्रबिंदू असणाऱ्या या सभागृहामध्ये सर्व समाजातील घटकाला प्रतिनिधित्व मिळणे अपेक्षित ठरते. त्यामुळे मुख्य

प्रवाहापासून वेगळी असलेल्या आर्थिक व सामाजिक दृष्टीने मागासलेल्या आदिवासी समाजास प्रतिनिधित्व मिळावे यासाठी त्यांना राखीव मतदारसंघाची व्यवस्था केली गेली आहे.

भारतातील सध्याचे महाराष्ट्र राज्य 1 मे 1960 रोजी अस्तित्वात आले. 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या विधान सभेच्या मतदारसंघाची संख्या 264 होती. यातील 14 जागा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव होते. 2008 मध्ये विधानसभा मतदारसंघाच्या परिसिमनानंतर महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांची संख्या 288 असून यातील 25 मतदारसंघ हे अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचा राजकीय सहभाग वाढवा व त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणा नुसार योग्य ते प्रतिनिधित्व विधिमंडळात मिळावे यासाठी 25 मतदारसंघ आदिवासी समाजासाठी राखीव ठेवण्यात आलेले आहेत. असे असले तरी आदिवासी समाजाचे प्रश्न हवे तेवढ्या प्रमाणात अजूनही सोडवले गेले नाहीत. आदिवासी समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी आदिवासी प्रतिनिधी सदैव प्रयत्नशील असले तरी त्यांच्या कार्यावर व भूमिकेवर राजकीय हित, पक्षीय कार्य, भूमिका व नियंत्रण अशा अनेक कारणांमुळे मर्यादा येतात. तसेच राखीव मतदार संघातील गैर आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी ही त्यांच्यावर असल्याने त्यांना हवा तेवढा वेळ आदिवासी प्रश्नांकडे देता येत नसल्याचे दिसते. आदिवासी समाजाचा विकास घडवण्यासाठी आदिवासी प्रतिनिधी कितपत यशस्वी ठरले आहेत, याचा अभ्यास करण्यासाठी व तसेच आदिवासी प्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघात केलेल्या विकास कार्याचे विश्लेषण करण्यासाठी संशोधकाने "महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा एक चिकित्सक अभ्यास (कालखंड 2009 ते 2019)" हे अभ्यास विषय निवडले आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीची स्थिती :-

भारतीय राज्यघटनेचे कलम 341 (1) अनुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना अनुसूचित जमाती असे म्हणतात. यात एकाकी, डोंगरावर, जंगलात राहणारे, ज्यांना आधुनिक संस्कृती व

जीवनाचा परिचय होऊ शकला नाही अशांचा समावेश होतो. अशा लोकांना गिरीजन किंवा आदिवासी असेही म्हणतात. महाराष्ट्रात अनुसूचित जमाती सुमारे 47 आहेत. महाराष्ट्रात भिल्ल, गोंड, महादेव कोळी, ढोर कोळी-टोकरे कोळी, पावरा, ठाकूर, वारली, अंध, कोकणा-कोकणी या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. राज्यात एकूण 36 जिल्हे आहेत आणि आदिवासींची संख्या मोठया प्रमाणात धुळे, नंदूरबार, जळगांव, नाशिक व ठाणे मधील सहयाद्रीचे पर्वतीय प्रदेश व चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ च्या गोंडवन प्रदेश या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये मुख्यत: अधिक आहे. महाराष्ट्रात 2011 सालच्या अंतिम जनगणनेनुसार अनुसूचित जमातींची लोकसंख्या 1,05,10,213 (सुमारे 1.05 कोटी) असून तिची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी 9.3% आहे. 2011 सालचे अंतिम जनगणनेनुसार महाराष्ट्रात अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येमध्ये सर्वात प्रथम क्रमांक नाशिक जिल्ह्याचा लागतो. नाशिक जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या सुमारे 15.64 लाख आहे. नाशिक जिल्ह्याखालोखाल नंदुरबार, पालघर, धुळे व जळगाव या जिल्ह्यांचा क्रमांक येतो. महाराष्ट्रात सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनुसूचित जमातींची लोकसंख्या सर्वात कमी आहे.

विषय निवड :-

आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्ट्या अतिशय मागासलेल्या आदिवासी समाजास मुख्य प्रवाहात आणून त्यांचा विकास घडविण्यासाठी अनेक धोरणे व योजना राबवले गेले. आदिवासी लोकांचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी तसेच त्यांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व प्राप्त होण्यासाठी राजकीय आरक्षण ही देण्यात आले. मात्र असे असले तरी, आदिवासी समाजाचे हवे तेवढ्या प्रमाणात विकास व राजकीय सहभाग वाढलेला दिसून येत नाही.

आदिवासी लोकप्रतिनिधी आदिवासी समाजाचे समस्या अगदी सहजतेने समजून घेत असले तरी त्यांच्यावर अनेक बंधने व मर्यादा असल्याने ते आदिवासी समाजाच्या विकासासाठी कमी पडताना दिसून येतात. आदिवासी लोकप्रतिनिधी आदिवासी समाजाच्या विकास घडवून आणण्यासाठी कितपत यशस्वी ठरले आहेत. याचा अभ्यास करण्यासाठी व तसेच आदिवासी लोकप्रतिनिधींना आपले कार्य बजावताना कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते. याचे सखोल अभ्यास करण्यासाठी संशोधकाने “महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास (विशेष कालखंड 2009 ते 2019)" हा विषय निवडला आहे.

संशोधन समस्या :-

विधानसभा राखीव मतदारसंघामुळे आदिवासी समाजाचे नेतृत्व राज्य विधिमंडळात नेतृत्व करत आहे. ही मोठी उपलब्धी आहे, पण ते खरोखरच आपल्या अधिकारांचा प्रभावीपणे वापर करतात का? कार्यकारी मंडळामध्ये त्यांना योग्य स्थान मिळते का? समित्यांवर कार्य करण्याची संधी त्यांना प्राप्त होते का? आदिवासी समाजाच्या विकासासाठी त्यांना कितपत सहकार्य प्राप्त होते, ही संशोधन समस्या आहे. आदिवासी प्रतिनिधी जेव्हा सभागृहात एखादी भूमिका मांडतात तेव्हा त्यांना कसा प्रतिसाद मिळतो? तसेच आपल्या मतदारसंघात कार्यकरताना आदिवासी नेतृत्वाला कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो? तसेच आदिवासी समाजाचे नेतृत्व निर्भिड स्पष्टवक्तेपणा असलेले आहे, की पक्षाच्या आदेशाचेच पालन करते. आदिवासी समाजाचे नेतृत्व राखीव जागा आहेत म्हणून विधानसभेवर जाते, पण तो आपल्या कार्यकर्तृत्वाने एक प्रलभ नेता म्हणून पुढे येतो का? येत नाही तर त्यावर काय मर्यादा आहेत ही संशोधनाची समस्या आहे

उद्दिष्टे :-

1. विधिमंळातील आदिवासी नेतृत्वाच्या जडण-घडणीचा अभ्यास करणे.

2. राज्य मंत्रिमंडळात आदिवासी लोकप्रतिनिधींना मिळणाऱ्या स्थानाचे अभ्यास करणे.

3. आदिवासी लोकप्रतिनिधींनी त्यांच्या मतदारसंघात केलेल्या विकास कार्याचा अभ्यास करणे.

4.आदिवासी नेतृत्वाच्या राजकीय संपादुकीवर प्रभाव टाकणारे घटक शोधून त्यांचा अभ्यास करणे.

5.आदिवासी नेतृत्वासमोर उद्भवणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

6.आदिवासी लोकप्रतिनिधीनी आदिवासी समाजाच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

7.महाराष्ट्राच्या राजकारणात आदिवासी लोकप्रतिनिधींचे स्थान कितपत प्रभावी आहे याचा अभ्यास करणे.

गृहीतके :-

1.आदिवासी समाज हा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेला आहे ज्याचा परिणाम राजकीय सहभागावर होतो.

2. राजकीय आरक्षणामुळे आदिवासी समाजास महाराष्ट्र विधिमंडळात गुणात्मक नेतृत्व प्राप्त झालेले आहे.

3. आदिवासी प्रतिनिधी असलेल्या मतदार संघाच्या विकास कार्यात गुणात्मक प्रगती घडून आलेली आहे.

4. आदिवासी प्रतिनिधी आदिवासी समाजाच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील असतात.

5. आदिवासी प्रतिनिधींच्या कार्य व भूमिकेवर त्यांच्या पक्षीय भूमिकेचा दबाव दिसून येतो.

6. आदिवासी नेतृत्वाला आपले कार्य बजावताना अनेक मर्यादा पडतात.

7. महाराष्ट्राच्या राजकारणात आदिवासी समाजास हवे तेवढे महत्त्व दिले जात नाही.

महत्व :-

1.आदिवासी लोकप्रतिनिधींना आपले कार्य बजावताना येणाऱ्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय सुचवण्याच्या दृष्टीने हा अभ्यास विषय महत्त्वाचा आहे.

2.आदिवासी नेतृत्वाचा विकास कितपत झाला आहे हे जाणून घेण्याच्या दृष्टीने हा अभ्यास विषय महत्त्वाचा आहे.

3.आदिवासी लोकप्रतिनिधींना राज्य मंत्रिमंडळात मिळणारे स्थान जाणून घेण्यासाठी हा अभ्यास विषय महत्वपूर्ण आहे.

4.आदिवासी प्रतिनिधी लोकांच्या आकांक्षा किती प्रमाणात पूर्ण करतात हे जाणून घेण्याच्या दृष्टीने हे अभ्यास विषय महत्त्वाचा आहे.

5.महाराष्ट्राच्या राजकारणात आदिवासी प्रतिनिधीचे स्थान कितपत प्रभावी आहे हे जाणून घेण्यासाठी हा अभ्यास विषय महत्त्वाचा आहे.

6.आदिवासी समाजाचे आर्थिक, सामाजिक व राजकीय विकास घडवून आणण्यात आदिवासी प्रतिनिधी कितपत यशस्वी ठरले आहेत हे जाणून घेण्यासाठी हा अभ्यास विषय महत्त्वपूर्ण आहे.

7.आदिवासी प्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघात जे कार्य केलेले आहे ते इतरांसमोर येऊन इतरांना दिशादर्शन करण्याच्या दृष्टीने हा अभ्यास विषय महत्त्वाचा आहे.

संशोधन व्याप्ती व मर्यादा:-

महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास (कालखंड 2009 ते 2019) या संशोधनात विधिमंडळात आदिवासी समाजासाठी राखीव असलेल्या मतदारसंघाचा अभ्यास केला जाणार आहे. तसेच संबंधित संशोधन विषय 2009 ते 2019 या कालखंडात महाराष्ट्र विधिमंडळात ज्या

आदिवासी लोकप्रतिनिधींनी कार्य केलेले आहे त्यांच्या कार्याचा अभ्यास करणार आहे. त्यामुळे या कालखंडाच्या अगोदर व नंतर ज्या आदिवासी प्रतिनिधींनी विधिमंडळात कार्य केले आहे त्यांचा यामध्ये समावेश नाही. स्थानिक स्वराज्य संस्था (शहर व ग्रामीण) तसेच केंद्रीय स्तरावरच्या आदिवासी नेतृत्वाचा यात समावेश नाही. आदिवासी समाजाचे जे नेतृत्व संस्था, संघटना, चळवळ यामध्ये कार्यरत आहेत त्यांचा या अभ्यास विषयात समावेश नाही. जे आदिवासी लोकप्रतिनिधी आदिवासींसाठी राखीव असलेल्या मतदार संघातून विधिमंडळावर निवडून गेले आहेत त्यांचाच अभ्यास या अंतर्गत करण्यात येणार आहे. ही संशोधनाची व्याप्ती व मर्यादा आहे.

नमुना निवड :-

महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा अभ्यास करताना सन 2009 ते 2019 हा कालखंड निवडण्यात आला आहे. या निवडलेल्या कालखंडाचे सन 2009 ते 2014 व सन 2014 ते 2019 यात विभागणी करण्यात येईल. यातील सन 2009 ते 2014 या कालखंडा साठी आदिवासी समाजासाठी राखीव असलेल्या 25 मतदारसंघांपैकी 7 मतदार संघाची निवड साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करण्यात येईल. सन 2014 ते 2019 या कालखंडाचा अभ्यास करताना ही 7 आदिवासी मतदारसंघाची साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करण्यात येईल. सन 2014 ते 2019 या कालखंडासाठी राखीव आदिवासी मतदारसंघाची निवड करताना सन 2009 ते 2014 या कालखंडात निवडलेल्या आदिवासी मतदारसंघाचा समावेश केला जाणार नाही. ज्यामुळे कोणत्याही आदिवासी मतदारसंघाची फेरनिवड टाळता येईल.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. यामध्ये एतिहासिक, **विश्लेषणात्मक**, वर्णनात्मक, तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. सदरील संशोधन कार्यात क्षेत्रकार्याचाही आंतर्भाव असल्यामुळे प्रश्नावली, अनुसूची, मुलाखत ही संशोधन तंत्र ही वापरण्यात येतील. आदिवासी समाजाचा पूर्व इतिहास व राजकीय इतिहास जाणून घेण्यासाठी ग्रंथालयीन संदर्भाचा ही आधार घेण्यात येईल.

तथ्य संकलन पद्धती :-

वस्तू संशोधनासाठी तथ्य संकलन करताना संशोधन क्षेत्र आणि त्या क्षेत्रातून निवडलेल्या एककांचा विचार करून तथ्य संकलित करण्यात येतील समस्या सूत्रनाच्या संदर्भाने आवश्यक ते संकलित करताना प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या स्त्रोतांचा अवलंब करण्यात येईल.

प्राथमिक स्त्रोत :-

महाराष्ट्र विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा चिकित्सक अभ्यास (विशेष कालखंड 2009 ते 2019) या संशोधनकार्यासाठी प्राथमिक तथ्य संकलनांचा मुख्य आधार घेण्यात येईल. राज्य विधिमंडळातील आदिवासी प्रतिनिधींचा सभागृहाच्या कामकाजातील सक्रिय सहभाग आणि त्यांच्या लोक विकासात्मक कार्याचे विश्लेषण करताना शासकीय दस्तावेज व मुलाखत अनुसूचीचा आधार घेण्यात येईल. गृहीत दशकातील राज्य विधिमंडळातील आदिवासी लोकप्रतिनिधी तसेच आदिवासींच्या राखीव मतदारसंघातील आदिवासी व आदिवासीत्तर समाजातील तज्ञ व्यक्तींची ही मुलाखत घेण्यात येईल.

दुय्यम स्त्रोत :-

सदर संशोधनकार्यासाठी प्राथमिक स्त्रोतांबरोबरच दुय्यम स्त्रोतांचा देखील आधार घेण्यात येईल. विविध शासकीय दस्तावेज निवडणूक आयोगाने घोषित केलेले निकाल, 2009 ते 2019 या दशकातील महाराष्ट्र विधिमंडळातील अधिवेशनाच्या कामकाजांचा अहवाल, संशोधन समस्येच्या संदर्भाने प्रकाशित व

अप्रकाशित संशोधन पर लेखन, विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके, विविध अहवाल, इंटरनेट व वेबसाईट इत्यादींचा दुय्यम स्त्रोतांचा या संशोधनासाठी वापर आधार घेण्यात येईल.

प्रकरणाची मांडणी

प्रकरण पहिले:- प्रस्तावना व विषय प्रवेश

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाची प्रास्ताविक मांडलेली असेल. यामध्ये संशोधन विषयाची निवड का केली, संशोधनाची उद्दिष्टे व गृहितके काय आहेत. सदरील संशोधन पूर्ण करण्यासाठी कोणती संशोधन पद्धती वापरण्यात आली. या संशोधनाचे व्याप्ती व मर्यादा व महत्त्व यांचे प्रतिपादन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे:- महाराष्ट्राचे विधिमंडळ

विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा अभ्यास करत असताना विधिमंडळ कामकाजाचे स्वरूप काय आहे, विधिमंडळ कामकाजाची व्याप्ती किती आहे. हे समजून घेणे महत्त्वाचे ठरते. यामुळे प्रकरण दुसरे म्हणून याची निवड करण्यात येईल.

प्रकरण तिसरे:- नेतृत्वाची संकल्पना व आदिवासी नेतृत्वाची जडणघडण

सदरील संशोधन आदिवासी नेतृत्वाशी संबंधित असल्यामुळे नेमके राजकीय नेतृत्व म्हणजे काय? नेतृत्व निर्मितीला कोणते घटक कारणीभूत ठरतात. नेतृत्वाचे संकल्पनात्मक विवेचन या भागात करण्यात येईल. तसेच आदिवासी समाजाच्या राजकीय इतिहासाचा आढावा यात घेतला जाईल. यामध्ये आदिवासी नेतृत्व निर्माण होण्यास ज्या बाबी सकारात्मक अथवा नकारात्मक ठरल्या त्याची चर्चा करण्यात येईल.

प्रकरण चौथे:- विधिमंडळातील आदिवासी नेतृत्वाचा अभ्यास इसवी सन 2009 ते 2014

इसवी सन 2009 ते 2014 या कालखंडात महाराष्ट्राच्या विधिमंडळात जे आदिवासी नेतृत्व कार्यरत होते. त्यांच्या कार्याचा व राजकीय भूमिकेचा अभ्यास या प्रकरणा अंतर्गत करण्यात येईल. यामध्ये त्यांनी आपल्या मतदारसंघात केलेले कार्य तसेच त्यांनी आदिवासी समाजासाठी केलेल्या कार्याचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण पाचवे :- विधिमंडळातील आदिवासी नेतृत्व इसवी सन 2014 ते 2019

इसवी सन 2014 ते 2019 या कालखंडात महाराष्ट्राच्या विधिमंडळात जे आदिवासी नेतृत्व कार्यरत होते. त्यांच्या कार्याचा व राजकीय भूमिकेचा अभ्यास या प्रकरणा अंतर्गत करण्यात येईल. यानुसार आदिवासी प्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघात केलेल्या कार्याचा आढावा घेतला जाईल. तसेच आदिवासी प्रतिनिधींनी आदिवासी समाजाच्या विकासासाठी कितपत सकारात्मक प्रयत्न केले याचे विश्लेषण केले जाईल.

प्रकरण सहावे : आदिवासी प्रतिनिधींना आपली जबाबदारी पार पाडताना येणाऱ्या समस्या व त्याची उकल

या प्रकरणांतर्गत इसवी सन 2009 ते 2019 या कालखंडात विधिमंडळात आदिवासी समाजाचे नेतृत्व करणाऱ्या प्रतिनिधींना आपल्या जबाबदारी पार पाडताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उकल सुचवले जातील.

प्रकरण सातवे:- सारांश निष्कर्ष शिफारशी

इसवी सन 2009 ते 2019 या कालखंडात महाराष्ट्राच्या विधिमंडळात आदिवासी समाजाचे जे राजकीय नेतृत्व होते. त्यांनी आपल्या मतदारसंघात केलेले कार्य व आदिवासी समाजाच्या विकासासाठी केलेल्या कार्यात त्यांना कितपत यश आले. या अनुषंगाने जे तथ्य संकलित केली जातील. त्यांच्या निर्वचनानंतर जी निष्कर्ष समोर येतील त्यांची मांडणी या प्रकरणांतर्गत करण्यात येईल.

संदर्भसूची

1.सामाजिक संशोधन पद्धती :- प्रदीप आगलावे

2.सामाजिक संशोधन :- बोधनकर

3.महाराष्ट्रातील आदिवासी जमाती :- डॉ. गोविंद गारे

4.आदिवासी समाजाचे समाजशास्त्र :- डॉ. एस. पी. घायाळ

5.भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया :- तुकाराम जाधव

6.भारतीय राज्यघटना व राजकीय व्यवहार :- डॉ. व्ही. एम. बाचलकर

7.दलितांचे आणि आदिवासींचे समाजशास्त्र :- पी.के. कुलकर्णी.

8.आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ. :- गोविंद गोरे.

9.राजकीय नेतृत्व :- ना.रा. खेकाळे.

10.महाराष्ट्र आदिवासी विकास विभाग एक दृष्टीक्षेप :- आदिवासी विकास मंत्रालय, मुंबई.

11. महाराष्ट्राचा भूगोल :- ए. बी. सवदी.

संशोधक

चेतनकुमार गंगाराम जकुलवार
एम. ए. राज्यशास्त्र, सेट, नेट.

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. एस.बी. फड
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय
नांदेड